**चितळसर पोलीस स्टेशन, ठाणे शहर**
दोस्ती एमएमआरडीए बिल्डींग नं.५,पहीला मजला, घोडबंदर रोड, ठाणे
(प) ४००६१०, दुरध्वनी क्रमांक ०२२ - २५८९९०७९
e-mail - cp.thane.chitalsarm@mahapolice.gov.in

**जावक क्रमांक ३०४/२०२५    चितळसर पोलीस स्टेशन, ठाणे    दिनांक :— १५/०१/२०२५**

# <u>अवैध गांजा कारवाई</u>

दिनांक १०/०१/२०२५ रोजी रात्रौ २१:०० वा. ते दि ११/०१/२०२५ सकाळी ०९.०० वा पोवतो पीसीआर १ मोबाईल गाडीवर पोहवा/५५३७ पाटील व पोशि ११६६ साळुंके यांचेसह पेट्रोलिंग करीत असतांना, सकाळी ०५.०० वा चे सुमारास पोखरण रोड क्रं २ वरील सुभाषनगर येथे एक पांढ-यां रगाची मारुती कंपनीची मोटारकार संशियास्पद दिसुन आली व कारचे बाजुला फुटपाथवर २ इसम दिसुन आले. सदर ठिकाणी मारुती कंपनीची स्विफ्ट डिझायार मॉडेलची कार क्रं एमएच ०३ बीसी १३४५ उभी असुन कार उभी होती. ड्रायव्हीग सिटवर बसलेल्या इसमास बाहेर बोलावुन सदर इसमाची चौकशी करीत असताना त्यांचेसोबतचे फुटपाथ वर उभे असलेले दोन इसम पळुन गेले व सदर चालक इसमाने उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने, पोहवा/५५३७ पाटील यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउनि/ श्री सांगळे व त्यांचे टिमला तसेच ठाणे अंमलदार पोउनि/विजय हिंगे यांना फोन करुन बोलावुन घेतले. पोउपनिरी सांगळे यांनी मारुती मोटार कार चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने रोहीतकुमार विजयकुमार पटेल वय- २४ वर्षे, राह. लोकमान्यनगर,वर्तकनगर ठाणे मुळ पत्ता ग्राम गेदुरहट,पो हनुमाना,जि रिवा,रा मध्य प्रदेश असे सांगितले व पळुन गेलेले इसमांपैकी एकाचे नाव मुन्ना पांडे असे असुन त्यांची मोटार कार असुन दुस-या इसमाचे नाव माहित नाही असे सांगितले. तेव्हा पोउपनिरी सांगळे यांनी सदर इसमास गाडीची डिक्की खोलण्यास सांगितली डिक्की खोलली असता डिक्कीमध्ये डिक्की मध्ये निळी, लाल,राखडी ,पिवळी अशा रंगाची प्लास्टीकची गोणी मिळुन आली असुन तिचे तोड हे प्लास्टीचे दोरीने बांधलेले होते. सदर गोनीमधुन येत असलेल्या उग्र वासावरुन तो गांजा हा अंमली पदार्थ असल्याची शंका आल्याने पोउपनिरी सांगळे यांनी सदर प्रकाराबाबत वपोनि श्री वरुडे सर यांना फोनद्वारे कळविले. वपोनि श्री वरुडे हे सदर घटनास्थळी येवून पहाणी केली व पोउपनिरी सांगळे यांनी सदर इसमाची अंगझडती तसेच मोटार वाहन (कार) चेकींग करण्यास सांगितले. मा. वपोनि सुनिल वरुडे यांचे सांगणेप्रमाणे पोहवा ६८ कलगुटकर, पोशि/१७८० पगारे यांनी नमुद इसमाची अंगझडती तसेच मोटार कारची झडती घेतली असता **स्विफ्ट डिझायार मॉडेलची कार क्रं एमएच ०३ बीसी १३४५ डिक्की** मध्ये निळी, लाल,राखडी , पिवळी अशा रंगाची प्लास्टीकची गोणी मिळुन आली असुन तिचे तोंड हे प्लास्टीक दोरीने बांधलेले असल्याने वपोनि श्री वरुडे यांनी ते खोलण्यास सांगितले असता त्याने ती गोनी खोलली असता सदर गोनीमध्ये खाकी कागदामध्ये एकुण २० पॅक केलेले पॅकेट दिसुन आले.

वपोनि श्री वरुडे यांनी रोहीतकुमार पटेल यास पॅकींगबाबत विचारणा केली असता त्याने ती पॅकेटमध्ये गांजा हा अंमली पदार्थ असल्याचे सांगितले. सदर अंमली पदार्थाची आणलेल्या ड्रग्ज डिटेक्शन किटमध्ये तपासणी प्रकिया उपलब्ध नसल्याने आम्हा पोलीसांचे अनुभवावरुन वनस्पतीचा रंग, गंध, स्पर्श व उग्र वासावरुन तो गांजा हा अंमली पदार्थ असल्याची आम्हा पोलीसांची खात्री झाली.

सदर इसम यांचे ताब्यात मिळुन आलेले मुद्देमाल वर्णन व त्याची किंमत खालील प्रमाणे

| अक्र | वर्णन | किंमत |
|---|---|---|
| १) | एका काळया रंगाचे त्यावर वेगवेगळे रंगाचे लाईन असलेली नायलॉन बॅग क्रं १ मध्ये एकुण १८किलो ६४० ग्रम वजनाचा गाजा भरलेला (वजन बॅगेसह) | ६,३०,०००/- रु कि सु |
| २) | दुस-या काळया रंगाचे त्यावर वेगवेगळे रंगाचे लाईन असलेली नायलॉन बॅग क्रं २मध्ये एकुण २२ किलो ८४५ ग्रम वजनाचा गाजा भरलेला (वजन बॅगेसह) | ७,७०,०००/- रु किं सु |
| ३) | एका हिरव्या रंगाच्या लिफाफ्यामध्ये भरलेल्याचे गांजाचे वजन एकुण १किलो ०३० ग्रम वजनाचा (वनज लिफाफ्यासह) | ३५,०००/- रु कि सु |
| ४) | एक मारुती कंपनीची स्वीफ्ट डिझायर कंपनीची मोटारकार नं एमएच०३ बीसी १३४५ पांढ-या रंगाची | ५,[illegible],०००/- रु कि सु |
| | एकुण किमतीचा | २०,[illegible],०००/- |

वरील प्रमाणे इसम नामे रोहीतकुमार विजयकुमार पटेल यांचे ताब्यात मोटार कारसह ४२ किलो ग्रॅम वजनाचा आमली पदार्थ गांजा १४,३५,०००/- रू किंमतीचा व ५,७५,०००/- रू किंमतीची मोटार कार मिळुन आल्याने सदर इसमाविरूध्द चितळसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक १६/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २०(ब) ii (क) अन्वये दिनांक ११/०१/२०२५ रोजी १४:४६ वा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे अधिक तपास करीता आरोपी नामे १) सिध्देश दत्तात्रय शिंदे, २) सुदर्शन सखाराम वाणी ३)राजेंश प्रभाकर लोखंडे यांचा गुन्हयात सहभाग निष्पण झाल्याने आरोपी क्रमांक १ व २ यांना तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेवून त्यांचे मुळ गावी गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथुन ताब्यात घेतले तसेच आरोपी क्रमांक ३ यास फुलबाजार मार्केट कल्याण येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी क्र ३ यांचेकडून गुन्हयात उपयोगी केलेला खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

| अनु | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १ | एक सफेद रंगाची बुलेरो पिकअप क्रमाक एच एच १४ केयु ७९४७ व चावी | ८,००,०००/- रू |
| एकुण | | ८,००,०००/- रू |

वरील प्रमाणे **चितळसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं १६/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २०(ब) ii (क) अन्वये** दाखल गुन्हयातील आरोपी क्रमांक १ ते ४

१) रोहीतकुमार विजयकुमार पटेल वय- २४ वर्षे, राह. लोकमान्यनगर,वर्तकनगर ठाणे मुळ पत्ता ग्राम गेदुरहट,पो हनुमाना,जि रिवा,रा मध्य प्रदेश
२) सिध्देश दत्तात्रय शिंदे, वय ३५ वर्षे राह. मुपो गोळेगाव, ता.जुन्नर जि. पुणे
३) सुदर्शन सखाराम वाणी वय २६ वर्षे, राह.मु.पो गोळेगाव, ता.जुन्नर जि.पुणे
४) राजेंश प्रभाकर लोखंडे, वय २९ वर्षे, रा.मुपो गोळेगाव, ता.जुन्नर जि. पुणे

वरील **आरोपी क्रमांक ०२ सिध्देश दत्तात्रय शिंदे** यांचेविरूध्द **नारायणगाव पोलीस स्टेशन, पुणे गुन्हा रजि नं १९६/२०२० गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिमाण करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २०(क) प्रमाणे गुन्हा** यापुर्वी दाखल आहे.

यांचेकडून एकुण २८,१०,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा व एक मारुती कंपनीची स्वीफ्ट डिझायर मोटारकार नं एमएच ०३ बीसी १३४५ तसेच एक सफेद रंगाची बुलेरो पिकअप क्रमाक एमएच १४ केयु ७९४७ व त्याची चावी असा मुद्देमाल जप्त करण्यात आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, मा. सह पोलीस आयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रा.विभाग श्री. विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, परि. ५ वा.ई. श्री. प्रशांत कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त, वर्तकनगर विभाग श्री. मंदार जवळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल वरूडे, यांचे मार्गदर्शनाखाली चितळसर पोलीस ठाणेचे तपास पथकातील पोउपनिरी/प्रशांत सांगळे, पोउपनि/पंकज लहाणे, पोउनि/विजय हिंगे, पोहवा/५५३७ सुरेश पाटील, पोहवा/६८ अभिजीत कलगुटकर, पोहवा/६६४९ अभिषेक सावंत, पोहवा/१२८६ संतोष चौगुले, पोहवा/१२६३ प्रमोद तायडे, पोहवा/६५७६ भरत घाटगे, पोहवा/६५७५ स्वप्निल शिंदे, पोहवा/६६५२ रविंद्र रावते, पोशि/१७८० दिगंबर पगारे, पोशि/११६६ किशोर साळुंखे, पोशि/४२५८ अभिजीत शिवणकर, मपोशि/४५१० रेश्मा शिंदे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउनि/प्रशांत सांगळे करीत आहेत.

OPPO F21s Pro
2025.01.15 16:35